म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
क्र. नं. २८३
२

म. ग्रं. सं. ठाणे

लेखक बा. रा. मोडे

सन १८७८

पुस्तकाचें नांव बालबोध

# बाळ रामचंद्र दोंदे

यांणीं केलें

तें

अलीबाग येथें

## रावजी हरी आठवले

यांणीं आपल्या

'सत्यसदन' छापखान्यांत छापिलें

शके १८०१ सन १८७९

दीन [illegible] आलों जगन्मोह[illegible]छला ॥ दीनबंधू
दया सागरा ॥ रक्षण करावा जगदो-
द्धारा ॥ दुजा कोण तुजवीण ॥ १ ॥
आह्मी तुह्मीं मंदमती ॥ लेंकुरें का जग-
त्पती ॥ या दुस्तर भवसिंधु पथीं
डळमळत आहों दिनानाथा ॥ २ ॥
तुझिया दयेशिवाय ॥ भवजाळा माजी
ठाय ॥ शोधणें आहे सर्वथा वाय ॥

माय बापा प्रियोत्तमा ॥ ३ ॥ तुझें प्रेम
कटाक्षरूप सुदर्शन ॥ आमुचें करगार
नाहीं रक्षण ॥ तरी दशा फार कठिण ॥
आमुची बापा अनंता ॥ ४ ॥ जैसी
व्याघ्रा हस्तीं येकुटी गाय ॥ सांपडे
सुटण्या नाहीं उपाय ॥ तैसा काम
क्रोधा हस्तीं हाय ॥ सांपडलों मी जग
दीशा ॥ ५ ॥ तरी बा कृपाघना ।

शरण आलों जगन्मोहना ॥ रक्षऊंश मा जगज्जीवना ॥ दया घना दयाळा ॥ ६ ॥ जिकडे टाकावी नजर ॥ तिकडे दिसे अद्भुत चमत्कार ॥ तुझिया कर्तृत्वाचा प्रसार ॥ ब्रह्मांडनायका समर्था ॥ ७ ॥ जों जों तुजविषयीं करावा विचार ॥ तों तों मती भ्रमते सार ॥ शेवटीं कुंठित होतो विचार ॥

परी दोष काय मतीचा ॥ ८ ॥ मुंगी नेचली जरी डोंगर ॥ तरी तिस दोष कोण देणार ॥ आह्मां अपूर्ण प्राण्यांस नाहीं होणार ॥ कल्पना तुझ्या पूर्ण त्वाची ॥ ९ ॥ करणी तुझी अघटीत ॥ लीला तुझी बहुताद्भुत ॥ महिमा तुझा अतर्क्यात्यंत ॥ शक्ती अपार अनंता ॥ १० ॥ अंतःकरण सद्गदीत ॥ ह्मोत्स्ना

ता प्रार्थितों जगन्नाथ ॥ जगत्पीता
नाममंडिता॥असशी बा सदयातूं॥११॥
भगवत् गुंगो माझें मन॥तूझिये पादप
द्मीं सर्वही ध्यान ॥ त्वत्कृपामृतें करून
तृप्तराहो सर्वदां ॥ १२॥ सर्वस्वी बा
जगजेठी ॥ आमुचे अपराध घालीं
पोटीं ॥ क्षणोक्षणीं अपराध कोटी ॥
होती बा सर्वज्ञा ॥ १३ ॥ आह्मा हत

आणि प्राण्यांस ॥ या भवजाळांतुनी सुटण्यास ॥ नको आशा करण्यास ॥ गांठिलें भयभवाब्धी मगरानें ॥१४॥

मदमत्छरादि व्याघ्र ॥ याणीं आह्मांसि केलें व्यग्र ॥ न धांवसि तरी कोणासि शीघ्र ॥ हाक मारूं दिनानाथा ॥१५॥

या दुस्तर भवसिंधुमाजी ॥ ग्रासीत असतां सर्वही व्याधी ॥ छळणूक सोंस

णार नाहींस माझी ॥ तरी प्रार्थूं कोणा
जगन्नाथा ॥ १६ ॥ हे भवाब्धि तारकं
नाविका ॥ जगन्मोहना जगन्नायका ॥
रक्षरक्ष बा जगत्पाळका ॥ हाक मारूं
दुजा कोणा ॥ १७ ॥ भवाब्धि मार्गे
बुडतों विश्वंभरा ॥ आरोळी मारतों
विश्वाधारा ॥ न देशी अभय जरी जग
दोद्धारा ॥ विनवूं दुजा कोणासी ॥१८॥

न द्रवशी जरी दयार्णवा ॥ तरी मज
कैंचा विसावा ॥ सन्निध उभा ऐस दे
वा ॥ हीच प्रार्थना दीनाची ॥ १९ ॥ हे
कृतांत कटक नाशका ॥ साह्य तूं अस
तां जगत्पाळका ॥ तुच्छ तुच्छ तो
वराका ॥ तृणवत सर्वथा समर्था ॥२०॥
रंक राजाचा नाहीं भेद ॥ सर्वांशीं पि
तृवत् संबंध ॥ पापी पुण्यवान हाच्ची

भेद ॥ तुजवळी सर्वोत्तमा ॥ २१ ॥
त्वदिच्छे पासाव उत्पत्ती ॥ स्थिती ल
य हीं वा जगत्पती ॥ थोर थोरां तुझी
कृती ॥ अगम्य निगमाही अनंता ॥२२॥
सूर्य आणि चंद्र अनंत ॥ ग्रहमंडळें अं
तरीं अपरिमित ॥ परि भ्रमण आहेत
करीत ॥ ब्रह्मांडनायका समर्था ॥२३॥
रक्षण करिता एकलाची॥ आणि पोषि

ता एकलाची ॥ त्राता मारिता एकला
ची ॥ मायबापा समर्था ॥२४॥ गुंतोनि
सुखामाजि क्षणिक ॥ विसरलों तुज
जगन्नायका॥भ्रमत आहों जगत्पालका॥
रक्ष रक्ष बा दयाळा ॥२५॥ नजाणे कै
सी करावी भक्ती॥ प्रार्थना ध्यान आणि
स्तुती ॥ तरी पाप्या कैंची मुक्ती ॥ पड
लों निराश्रित जगदीशा ॥२६॥ नल

गे सुख संतति संपत्ती । पूर्ण आनंद ठे
वशील त्या स्थिती ॥ प्रार्थना इतुकीच
जगत्पती ॥ ऐस सन्निध सर्वथा ॥२७॥
सुखदुःखाचें मूळ तूंची ॥ तरी वृथा खंती
करणे याची ॥ सर्व माया भ्रम भवजाळ
ची ॥ बाहुलीं आम्ही खेळत आहों॥२८॥
तरी प्रार्थना आहे इतुकीचि॥ सतत मा
नसीं त्वद्दस्तीचो ॥ मनोभावें ओळख

णेची ॥ इच्छा नाहीं दुजी बा ॥२९॥स
न्निध असतां जगजेठी ॥ लोभ मदादि
महा कपटी ॥ पळत सुटतील दाही वा
टी ॥ नाहीं थारा त्या दुष्टां ॥ ३० ॥
महा चांडाळ तो काम ॥ तेणें ग्रासिलें
हृदय मम ॥ तेथूनि सुटका दुर्घट परम॥
धांव धांव बा अनंता ॥ ३१ ॥ पुन्हा
प्रार्थितों जगदिशा॥येवढी दीन घाली

भिक्षा ॥ निर्दाळूनी काम आह्मा रक्षा॥ ग्रासियेलें जगतासीं ॥ ३२ ॥ व्यर्थ व्यर्थ हा संसार॥चार प्रहराचा विचार॥ माया खेळ साचार ॥ स्वप्नवत् होई एक क्षणीं ॥ ३३ ॥ एक ह्मणे मूलबाळ॥ एक ह्मणें प्रिया वेल्हाळ ॥ कैंचें मूल आणि वेल्हाळ ॥ सोडूनि जातील क्षणा माजी ॥ ३४ ॥ मिळती चुलते आणि

भाचे ॥ आप्त सर्वही पैशाचे ॥ नाहीं को
णी जीवाचें ॥ तुज वांचुनी भगवंता
॥ ३५ ॥ व्यर्थ व्यर्थ हा मायाजाळ ॥ घे
ऊनि जाईल केव्हांचि काळ ॥हा विचार
सर्वकाळ ॥ वसो मानसीं माझ्या वा
॥ ३६ ॥ संपत्तीची केलीस विपुलता ॥
तरीमन धांवो त्वत्पदीं सर्वदा ॥ चिरका
ल दौलती साठीं सिद्धता ॥ असावी मा

ज्ञी अनंता ॥ ३७ ॥ दुष्ट कृत्य केलें ए
कांतीं ॥ परी एकांताची व्यर्थ भ्रांती ॥
तेंचि अधोगती नेईल अंतीं ॥ अमृत
नेत्र सर्वज्ञा ॥ ३८ ॥ संकटीं आणि द्वारि
द्र्यावरुथेंत ॥ अटव्यरानीं मित्र राहित ॥
तरी असशी संनिध नाथ ॥ वसों ऐसें
मानसीं वा ॥ ३९ ॥ त्वदिच्छेनाजी
असतां वर्तन क्रम ॥ निंदा करिती जरी

अधमाग्न निश्चल प्रीति परमाराहो भक्तीं तुझ्या वा ॥ ४० ॥ परी सुमार्गीं लावल्या कुमती ॥ आप्त मित्र शत्रु मागुती ॥ मम कल्याणेच्छा जगत्पती नको आधीं कांहीं तें ॥ ४१ ॥ जळीं काष्टीं पाषाणीं ॥ आज्ञा करिते एकची वाणी ॥ वक्रदृष्टी होतां दैन्य वाणी ॥ होतील सर्वही क्षणा माजीं ॥ ४२ ॥

अनन्यभावें जगत्पती ॥ शरण आलों मी मूढमती ॥ प्राशन करणेस अमृत भक्ती ॥ तान्हियेला आत्मा हा ॥४३॥ मनोभावें तुझी प्रिती ॥ज्ञानें ओळखणें तुझी उक्ती ॥ हींच शेवटीं देतील मुक्ती॥ पाखांड नये कामा ॥४४ ॥गाढ निद्रे स्त अंधकारी ॥ आत्मा जड जाहाला से भारी॥पाडुनी भक्ती किरण दुष्टारी॥

निद्रळीं त्या अंधःकारा ॥ ४५ ॥ ओवटीं ॥ प्रार्थना अनंता ॥ म्यां पामरें तुझे गुण वर्णितां ॥ अनंत आयुष्यें बा जगन्नाथा ॥ पुरणार नाहींत समर्था ॥ ४६ ॥ अनंत हस्त दमतील ॥ सर्व मतीहि कुंठितील कारण वाचे मानसाचे ॥ अवर्ण्यातर्क्य गुण असती तुझे दा ॥ ४७ ॥ तूं अचिंत्य ॥ अवर्ण्य ॥ अंत

दीन दयाळा दीन वत्छला ॥ दीन बंधू दया सागरा ॥ रक्षण करिंषा जगदोद्धारा ॥ दुजा कोण तुजवीण ॥ १ ॥ आह्मी तुह्मीं मंदमती ॥ लेंकुरें या जगत्पती ॥ या दुस्तर भवसिंधु पंथीं ॥ उमळत आहों दिनानाथा ॥ २ ॥ तुझिया दयेशिवाय ॥ भवजाळा माजीं ठाय ॥ शोधणें आहे सर्वथा वायां ॥

माय बापा प्रियोत्तमा ॥ ३ ॥ तुझें प्रेम
कटाक्षरूप सुदर्शन ॥ आमुचें करणार
नाहीं रक्षण ॥ तरी दशा फार कठिण॥
आमुची बापा अनंता ॥ ४ ॥ जैशी
व्याघ्रा हस्तीं येकुटी गाय ॥ सांपडे
सुटण्या नाहीं उपाय ॥ तैसा काम
क्रोधा हस्तीं हाय ॥ सांपडलों मी जग
दीशा ॥ ५ ॥ तरी बा कृपाघना ॥

शरण आलों जगन्मोहना ॥ रक्षरक्ष वा जगज्जीवना ॥ दया घना दयाळा ॥ ६ ॥ जिकडे टाकावी नजर ॥ तीकडे दिसे अद्भुत चमत्कार ॥ तुझिया कर्तृत्वाचा प्रसार ॥ ब्रह्मांडनायका समर्था ॥ ७ ॥ जों जों तुजविषयीं करावा विचार ॥ तों तों मती भ्रमते सार ॥ शेवटीं कुंठित होतो विचार ॥

परी दोष काय मतीचा ॥ ८ ॥ मुंगी नोचली जरी डोंगर ॥ तरी तिस दोष कोण देणार ॥ आह्मां अपूर्ण प्राण्यांस नाहीं होणार ॥ कल्पना तुझ्या पूर्ण त्वाची ॥ ९ ॥ करणी तुझी अघटीत ॥ लीला तुझी बहुताद्भुत ॥ महिमा तुझा अतर्क्यात्यंत ॥ शक्ती अपार अनंता ॥ १० ॥ अंतःकरण सद्गदीत ॥ होत्सा

ता प्रार्थितों जगन्नाथ ॥ जगत्पिता
नाममंडित॥असशी बा सदया तूं॥११॥
भगवत् गुंगो माझें मन॥तुझिये पादप
द्मीं सर्वहीं ध्यान ॥ त्वत्कृपामृतें करून
तृप्त राहो सर्वदां ॥ १२॥ सर्वस्वी बा
जगजेठी ॥ आमुचे अपराध घालीं
पोटीं ॥ क्षणोक्षणीं अपराध कोटी ॥
होती बा सर्वज्ञा ॥ १३ ॥ आम्हा हत

भागी प्राण्यांस ॥ या भवजाळांतुनी
सुटण्यास ॥ नको आशा करण्यास ॥
गांठिलें भयभवाब्धी मगरानें ॥१४ ॥
मदमत्छरादि व्याघ्र ॥ याणीं आह्मांसि
केलें व्यग्र ॥ न धांवसि तरी कोणासि
शीघ्र ॥ हाक मारूं दिनानाथा ॥१५॥
या दुस्तर भवसिंधुमाजी॥ ग्रासीत अ
सतां सर्वही व्याधी ॥ छळणुक सोस

पार नाहींस माझी ॥ तरी प्रार्थूं कोणा जगन्नाथा ॥ १६ ॥ हे भवाब्धि तारक नाविका ॥ जगन्मोहना जगन्नायका ॥ रक्षरक्ष बा जगत्पाळका ॥ हाक मारूं दुजा कोणा ॥ १७ ॥ भवाब्धि मा। ि बुडतों विश्वंभरा ॥ आरोळी मारतों विश्वाधारा ॥ न देशी अभय जरी जग दे।द्धारा ॥ विनवूं दुजा कोणासी ॥१८॥

न द्रवशी जरी दयार्णवा ॥ तरी मज कैंचा विसावा ॥ सान्निध उभा ऐस देवा ॥ हीच प्रार्थना दीनाची ॥ १९ ॥ हे कृतांत कटक नाशका ॥ साह्य तूं असतां जगत्पालका ॥ तुच्छ तुच्छ तो वराका ॥ तृणवत सर्वथा समर्था ॥२०॥ रंक राजाचा नाहीं भेद ॥ सर्वांशीं पितृवत् संबंध ॥ पापी पुण्यवान हाची

भेद ॥ तुजजवळी सर्वोत्तमा ॥ २१ ॥
त्वदिच्छे पासाव उत्पत्ती ॥ स्थिती ल
य हीं बा जगत्पती ॥ थोर थोरां तुझी
कृती ॥ अगम्य निगमाही अनंता ॥ २२ ॥
सूर्य आणि चंद्र अनंत ॥ ग्रहमंडळें अं
तरी अपरिमित ॥ परि भ्रमण आहेत
करीत ॥ ब्रह्मांडनायका समर्था ॥ २३ ॥
रक्षण करिता एकलाची ॥ आणि पो षि

ता एकलाची ॥ त्राता मारिता एकलीं
चा ॥ मायबापा समर्था ॥२४॥ गुंतोंसि
सुखाभाजि क्षणिक ॥ विसरलों तुज
जगन्नायका॥भ्रमत आहों जगत्पाळका॥
रक्ष रक्ष बा दयाळा ॥२५॥ नजाणें कै
सी करावी भक्ती॥ प्रार्थना ध्यान आणि
स्तुती ॥ तरी पाप्या कैंची मुक्ती ॥ पड
लों निराश्रित जगदीशा ॥२६॥ नल

गे सुख संतति संपत्ती । पूर्ण आनंद ठे
वशील त्या स्थिती ॥ प्रार्थना इतुकीच
जगत्पती ॥ ऐस सान्निध सर्वथा ॥२७॥
सुखदुःखाचें मूळ तूंची ॥ तरी वृथा खंतीं
करणे याची ॥ सर्व माया भ्रम भवजाळ
ची ॥ बाहुलीं आम्ही खेळत आहों॥२८॥
तरी प्रार्थना आहे इतुकीचि॥ सतत मा
नसीं त्वद्वस्तीची ॥ मनोभावें ओळख

णेची ॥ इच्छा नाहीं दुजी बा ॥२९॥स
न्निध असतां जगजेठी ॥ लोभ मदादि
महा कपटी ॥ पळत सुटतील दाही वा
टी ॥ नाहीं थारा त्या दुष्टां ॥ ३० ॥
महा चांडाळ तो काम ॥ तेणें ग्रासिलें
हृदय मम ॥ तेथूनि सुटका दुर्घट परम॥
धांव धांव बा अनंता ॥ ३१ ॥ पुन्हा
प्रार्थितों जगदिशा॥येवढीं दीना घाली

भिक्षा ॥ निर्दाळूनी काम आह्मा रक्षा॥
ग्रासियेलें जगतासीं ॥ ३२ ॥ व्यर्थ
व्यर्थ हा संसार॥चार प्रहराचा विचार॥
माया खेळ साचार ॥ स्वप्नवत् होई
एक क्षणीं ॥ ३३ ॥ एक ह्मणे मूलबाळ॥
एक ह्मणें प्रिया वेल्हाळ ॥ कैंचें मूल
आणि वेल्हाळ ॥ सोडूनि जातील क्षणा
माजी ॥ ३४ ॥ मिळती चुलते आणि

भाचे ॥ आस सर्वही पैशाचे ॥ नाहीं को
णी जीवाचें ॥ तुज वांचुनी भगवंता
॥ ३५ ॥ व्यर्थ व्यर्थ हा मायाजाळ ॥ घे
ऊनि जाईल केंव्हांचि काळ ॥हा विचार
सर्वकाळ ॥ वसो मानसीं माझ्या वा
॥ ३६ ॥ संपत्तीची केलीस विपुलता ॥
तरीमन धांवो त्वत्पदीं सर्वदा ॥ चिरका
ल दौलती साठीं सिद्धता ॥ असावी मा

झी अनंता ॥ ३७ ॥ दुष्ट कृत्य केलें ए
कांती ॥ परी एकांताची व्यर्थ भ्रांती ॥
तेंचि अधोगती नेईल अंतीं ॥ अनंत
नेत्र सर्वज्ञा ॥ ३८ ॥ संकटीं आणि दारि
द्रावस्थेंत ॥ अट व्यरानीं मित्र रहित ॥
तरी असशी संनिध नाथ ॥ वसो ऐसें
मानसीं बा ॥ ३९ ॥ त्वदिच्छेमाजी
असतां वर्तन क्रम ॥ निंदा करिती जरी

अधम॥मन निश्चल प्रीति परम॥राहो
भक्तीं तुझ्या वा ॥ ४० ॥ परी सुमा
र्गीं लावत्या कुमती ॥ आप्त मित्र शत्रू
मागुती ॥ मम कल्याणेच्छा जगत्पती
नको आधीं कांहीं तें ॥ ४१ ॥ जळीं
काष्ठीं पाषाणीं ॥ आज्ञा करिते एकची
वाणी ॥ वक्रदृष्टी होतां दैन्य वाणी ॥
होतील सर्वही क्षणा माजीं ॥ ४२ ॥

अनन्यभावें जगत्पती ॥ शरण आलों मी मूढमती ॥ प्राशन करणेस अमृत भक्ती ॥ ताान्हेयेला आत्मा हा ॥४३॥ मनोभावें तुझी प्रिती ॥ज्ञानें ओळखणें तुझी उक्ती ॥ हींच शेवटीं देतील मुक्ती॥ पाखांड नये कामा ॥४४ ॥गाढ निद्रिस्त अंधकारी ॥ आत्मा जड जाहाला से भारी॥पाडुनी भक्ती किरण दुष्टारी॥

निद्र्ळी त्या अंधःकारा ॥ ४५ ॥ शे
वटीं ॥ प्रार्थना अनंता ॥ म्यां पामरें
तुझे गुण वर्णितां ॥ अनंत आयुष्यें बा
जगन्नाथा ॥ पुरणार नाहींत समर्था
॥ ४६ ॥ अनंत हस्त दमतील ॥ सर्व
मतीहि कुंठितील कारण वाचे मानसा ॥
अवर्ण्यातर्क्य गुण असती तुझे बा
॥ ४७ ॥ तूं अचिंत्य ॥ अवर्ण्य ॥ अत

र्य ॥ अलक्ष्य ॥ अलिप्त ॥ अदृष्य ॥
अनाद्यंत ॥ वा जगदीश ॥ साष्टांग
प्रणाम करित असे ॥ ४८ ॥ हें मान
सिक भक्ती पुजन ॥ करित आहें
तुज अर्पण ॥ प्रीय होवोत जगन्मो
हन ॥ बोबडे बोल अर्भकाचे ॥ ४९ ॥
हे बालबोल लीन अत्यंत॥ ठसोत हृद
यीं प्रेमभरित ॥ इतुकीचि विनंती ॥

भगवंत करितों बाल अल्पमती ॥५०॥

र्य ॥ अलक्ष्य ॥ अलिप्त ॥ अदृष्ये ॥
अनाद्यंत ॥ बा जगदीश ॥ साष्टांग
प्रणाम करित असे ॥ ४८ ॥ हें मा
सिक भक्ती पुजन ॥ करित आ
तुज अर्पण ॥ प्रीय होवोत जगन्मो
हन ॥ बोबडे बोल अर्भकाचे ॥ ४९ ॥
हे बालबोल लीन अत्यंत॥ ठसोत हृद
यीं प्रेमभरित ॥ इतुकीचि विनंती ॥

भगवंत करितों बाळ अल्पमती ॥८०॥